DAY — **05**     SEAT NUMBER | | | | | | |

| 2025 | VI | 30 | 1100 | **J-349** | (M) |
|---|---|---|---|---|---|

# SECRETARIAL PRACTICE (52)

**Time : 3 Hrs.**     **(7 Pages)**     **Max. Marks : 80**

***सूचना :***
*(१) सर्व प्रश्न सोडविणे अनिवार्य आहे.*
*(२) उजवीकडील अंक प्रश्नांचे पूर्ण गुण दर्शवितात.*
*(३) डावीकडील अंक प्रश्नांचे क्रमांक दर्शवितात.*
*(४) प्रत्येक प्रश्नाच्या उत्तराचा प्रारंभ नवीन पानावर करावा.*

**प्र. १. (अ)** खाली दिलेल्या पर्यायांमधून योग्य पर्याय निवडून वाक्य पुन्हा लिहा : (५) **[२०]**

(१) कर्जाऊ भांडवलावर -------- दिले जाते.

(अ) व्याज

(ब) सूट

(क) लाभांश

(२) ठेवी या कमीतकमी सहा महिन्यांसाठी व जास्तीत जास्त ------- महिन्यांसाठी स्वीकारता येतात.

(अ) ३६

(ब) १३

(क) ३०

(३) वाहक कर्जरोखेधारकांना ------ द्वारे व्याज दिले जाते.

(अ) व्याज अधिपत्र

(ब) परतावा आदेश

(क) व्याज कूपन

(४) ----- ISIN साठी आवेदन सादर करावे लागते.

(अ) ठेवीदारांना

(ब) डिपॉझिटरी पार्टीसिपंटना

(क) कंपन्यांना

(५) वित्तीय बाजार असा बाजार आहे ज्यामध्ये लोक --------- आणि डेरिव्हेटीव्हचा कमी व्यवहार किंमतीवर व्यापार करतात.

(अ) सोने

(ब) वित्तीय प्रतिभूती

(क) वस्तू

**(ब)** जोड्या जुळवा : (५)

| 'अ' गट | 'ब' गट |
| --- | --- |
| (अ) बोनस भाग | (१) इलेक्ट्रॉनिक क्लिअरींग सर्व्हिस |
| (ब) दिलगिरी पत्र | (२) कर्जरोखेधारक |
| (क) ई.सी.एस. | (३) भाग वाटप न करणे |
| (ड) लाभांश | (४) इलेक्ट्रॉनिक को-ऑपरेटिव्ह सोसायटी |

(इ) सेबी

(५) भारतातील सगळ्यात जुन्या भाग बाजारांपैकी एक

(६) नफ्याचे भांडवलीकरण

(७) प्रतिभूती बाजारात गुंतवणुकदारांच्या हिताचे रक्षण करणे

(८) भागधारक

(९) कर्जाचे भांडवलीकरण

(१०) भागांचे वाटप

**(क)** खालील प्रत्येक विधानासाठी एक शब्द किंवा शब्दसमूह किंवा संज्ञा लिहा : (५)

(१) एकूण भांडवलातील वेगवेगळ्या प्रतिभूतींचे गुणोत्तर.

(२) भागांवरील मालकी हक्क दर्शविणारा दस्तऐवज.

(३) कर्जरोखे प्रमाणपत्राचे वाटप कंपनीने या कालावधीमध्ये केले पाहिजे.

(४) कंपनी आणि ठेव विश्वस्त यांच्यामधील करार.

(५) भारत सरकारच्या वतीने मध्यवर्ती बँकेने सादर केलेले विपत्र.

**(ड)** खालील वाक्यांतील अधोरेखित शब्द दुरुस्त करून वाक्य पुन्हा लिहा : (५)

(१) लाभांशाचे वाटप त्याच्या घोषणेपासून ६० दिवसांच्या आत केले पाहिजे.

(२) <u>एफ.पी.ओ.</u> म्हणजे जनतेला पहिल्यांदा भागांची सार्वजनिक विक्री करणे.

(३) जेव्हा अर्थव्यवस्थेत <u>मंदी</u> असते तेव्हा विक्रीमध्ये वाढ होते.

(४) ठेवी हा वित्त पुरवठ्याचा <u>अंतर्गत</u> मार्ग आहे.

(५) बंधपत्र हे <u>अल्प मुदतीचा</u> निधी पुरविते.

**प्र. २. खालील संज्ञा / संकल्पना स्पष्ट करा (कोणत्याही <u>चार</u>) :** **[८]**

(१) मंदीवाला

(२) वित्त गुंतवणुकीचा निर्णय

(३) कर्जाऊ भांडवल

(४) डिमटेरियलायझेशन

(५) हक्क भाग

(६) प्राथमिक बाजार

**प्र. ३. खालील घटना / परिस्थितीचा अभ्यास करून आपले मत लिहा (कोणत्याही <u>दोन</u>) :** **[६]**

(१) श्री. जतिन हे कंपनी सचिव म्हणून कार्यरत आहेत. ते विविध कंपन्यांना कंपनी कायद्यासंदर्भात सल्ला देण्याचे कार्य करतात. त्यांच्या ग्राहकांच्या काही समस्या आहेत. श्री. जतिन यांना समस्या सोडविण्यासाठी मदत करा.

(अ) BDI बँक डिपॉझिटरी पार्टिसिपंट (D.P.) म्हणून सेवा देऊ इच्छितात, तर त्यांनी नोंदणीसाठी कोणाकडे अर्ज करावा?

(ब) KM फिनान्शियल कर्जरोखे विश्वस्त म्हणून सेवा देऊ इच्छितात, तर त्यांनी नोंदणीसाठी कोणाकडे अर्ज करावा?

(क) T.T. कंपनी लिमिटेड प्रारंभिक भाग (IPO) विक्री करू इच्छिते तर तिने सेबीकडे नोंदणी करावी का?

(२) साई कंपनी लिमिटेड ने अंतरिम लाभांश देण्याचे निश्चित केले.

(अ) पुरेशा नफ्याअभावी ₹ ५/- प्रतिभाग लाभांश देण्याचा संचालक मंडळाचा निर्णय योग्य आहे का?

(ब) संचालक मंडळ मुक्त राखीव निधीतून लाभांश देऊ शकते का?

(क) संचालक मंडळ भांडवलातून लाभांश जाहीर करू शकते का?

(३) मून प्रायव्हेट लिमिटेड कंपनीला ठेवी स्वीकारून भांडवलात वाढ करायची आहे.

(अ) कंपनीला सामान्य जनतेकडून ठेवी स्वीकारता येतील का?

(ब) ठेवी स्वीकारण्यासाठी कंपनीने कोणते दस्तऐवज द्यावेत?

(क) कंपनी जास्तीत जास्त किती कालावधीसाठी ठेवी स्वीकारू शकते?

**प्र. ४. खालील मध्ये फरक स्पष्ट करा (कोणतेही तीन) :** **[१२]**

(१) स्थिर भांडवल आणि खेळते भांडवल

(२) प्राथमिक भाग विक्री (IPO) आणि पुढील भाग विक्री (FPO)

(३) अंतिम लाभांश आणि अंतरिम लाभांश

(४) नाणे बाजार आणि भांडवल बाजार

**प्र. ५. खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा (कोणतेही दोन) :** **[८]**

(१) भाग प्रमाणपत्रातील तपशील विशद करा.

(२) गुंतवणूकदारास भागपेढी पद्धतीचे कोणतेही चार फायदे स्पष्ट करा.

(३) ठेवीची स्वीकृती बाबतच्या कोणत्याही चार अटी व शर्ती लिहा.

**प्र. ६. खालील विधाने सकारण स्पष्ट करा (कोणतेही दोन) :** **[८]**

(१) अग्रहक्क भागांना मतदानाचे सर्वसाधारण हक्क नसतात.

(२) कर्जरोख्यांची विक्री करताना कंपनीला कर्जरोखे विश्वस्तांची नेमणूक करावी लागते.

(३) लाभांश कंपनीच्या नफ्यातून दिला जातो.

(४) डिपॉझिटरी ही सहज आणि जलद भाग हस्तांतरण करते.

**प्र. ७. खालील प्रश्न सोडवा (कोणतेही दोन) :** **[१०]**

(१) भागधारकाच्या लाभांशाचा दर कमी असल्याबद्दल तक्रार करणाऱ्या पत्रास उत्तर लिहा.

(२) कर्जरोखेधारकास व्याज अधिपत्राद्वारे व्याज दिल्याचे कळविणारे पत्र लिहा.

(३) ठेवीदारास ठेव परतफेडीबाबत पत्र लिहा.

**प्र. ८. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा (कोणताही <u>एक</u>) :** **[८]**

(१) कर्जरोख्यांची व्याख्या लिहा व त्यांची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

(२) भागभांडवलांचे वर्गीकरण स्पष्ट करा.

◆◆◆